Literacy for a Billion

Movie: Asla Navra Nako Ga Bai
Year: 1977

Song: Tula Baghun Majha Jeev
Lyricist:

साजणी...गं...
अगं नको जाऊ
नको जाऊ
पाठ फिरवूनी सखे साजणी
रूप गुणकणी गं माझे राणी
तुला बघून माझा जीव लागला झुरणी
तुला बघून माझा जीव लागला झुरणी

नको नजरबाण ह्यो
हे नको नजरबाण ह्यो
दुखंल तुझी पापणी
नको मारूस मुरका
मान अशी झटकुनी
दृष्ट माझीचं लागंल तुला
गुलाबाच्या फुला ध्यास लागला
असा फिर फिरूनी
असा फिर फिरूनी
अन् तुला बघून माझा जीव लागला झुरणी
गं तुला बघून माझा जीव लागला झुरणी
नागमोडी चालू नको
कोडं मला घालू नको
कशाची झाली घाई
मागं म्होर बघू नको
ठुमकत जाऊ नको
कंबर लचकेल बाई
ये जवळ जरासं बसू
गालामधी हसू बोलू खुसूखुसू
हाती हात धरूनी
हाती हात धरूनी
अन् तुला बघून माझा जीव लागला झुरणी
गं तुला बघून माझा जीव लागला झुरणी

नको शिनवू नारी उभार काया अशी
पिरतीची शाल घे काळजाची देतो उशी
मंचकी इसावा घ्यावा
शिनभाग जावा
बहर नवा यावा अंगी सरसरूनी
अंगी सरसरूनी
अन् तुला बघून माझा जीव लागला झुरणी
हे तुला बघून माझा जीव लागला झुरणी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*